# आपत्ती नियंत्रण कक्ष
## तहसिलदार शिरोळ यांचे कार्यालय, तालुका- शिरोळ, जिल्हा कोल्हापूर

E-Mail- tahshirol@gmail.com दुरध्वनी/फॅक्स-०२३२२-२३६४४७


क्र.नै.आ.कावि /२३४/2021 दिनांक : 21/07/2021

## प्रेस नोट

विषयः सन २०२१-२०२२ मध्ये शिरोळ तालुक्यामध्ये पुरामुळे विस्थापित होणाऱ्या जनावरांकरिता छावणी उभारणी करून चारा, पाणी व पशुखाद्य उपलब्ध करून देण्यासाठी सेवाभावी संस्थेकडून दरपत्रके मागवणेबाबत

---

सन २०१९ मध्ये शिरोळ तालुक्यात मोठ्या प्रमाणात नद्यांना पूर आला होता. पुरामध्ये एकूण 43 गावे बाधित (१९ पूर्ण व २४ अंशतः बाधित) झाली होती. त्यामुळे पूरग्रस्त जनावरांना सुरक्षित ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात विस्थापित करण्यात आले होते. सन २०२१-२०२२ मध्ये हवामान खात्याने मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली असून कोल्हापूर जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे आपत्कालीन सभेतील मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्कालीन समिती, कोल्हापूर यांचेकडील सूचनांनुसार संभाव्य विस्थापित कराव्या लागणाऱ्या जनावरांकरिता तात्पुरत्या स्वरुपात छावणी उभा करून चारा, पशुखाद्य व मुबलक पाणी पुराविणेकरिता सेवाभावी संस्थांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

### अटी व शर्ती:

सन २०१९ मध्ये खालीलप्रमाणे गावे पुरामुळे बाधित झाली होती

पूर्ण बाधित: १) हसूर २) आलास ३) कुरूंदवाड ४) बस्तवाड ५) जुने दानवाड ६) घालवाड ७) शिरटी ८) नृसिंहवाडी ९) गौरवाड १०) कवठेसार ११) नवे दानवाड १२) कुटवाड १३) अर्जूनवाड १४) खिद्रापूर १५) बुबनाळ १६) कनवाड १७) औरवाड १८) राजापूरवाडी १९) राजापूर (विस्थापित पशुधन: लहान- २६१२, मोठी- २२३१९ एकूण-२४९३१)

अंशतः बाधित: १) दत्तवाड २) घोसरवाड ३) टाकळी ४) शिरढोण ५) टाकवडे ६) अब्दुललाट ७) शिरदवाड ८) नांदणी ९) धरणगुत्ती १०) कवठेगुलंद ११) गणेशवाडी १२) शेडशाळ १३) अकिवाट १४) हेरवाड १५) तेरवाड १६) मजरेवाडी १७) शिरोळ १८) आगर १९) जयसिंगपूर २०) दानोळी २१) कोथळी २२) उमळवाड २३) उदगाव २४) चिंचवाड (विस्थापित पशुधन: लहान- १४८२३, मोठी-५३७९२ एकूण-६८६१५)

- पूरग्रस्त कालावधीमध्ये प्राधान्याने पूर्ण बाधित गावांसाठी {१. आगर, २. नवे दानवाड, ३. कवठेगुलंद माळ, ४.टाकळीवाडी ५. तेरवाड} सुरवातीच्या टप्प्यामध्ये जनावरांकरिता तात्पुरत्या स्वरुपात छावणी उभी करण्याची आहे. त्यानंतर आवश्यकतेनुसार पुढील टप्प्यामध्ये इतर अंशतः बाधित गावांसाठी छावणी उभी करण्यासाठी नियोजन करून दरपत्रके मागविण्याची कार्यवाही करण्यात येईल.
- शासकीय निकपाप्रमाणे व केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निकषांप्रमाणे छावणीत दाखल असलेल्या प्रति मोठ्या जनावरास प्रतिदिन रु.७०/- व लहान जनावरास प्रतिदिन रु.३५/- अनुदान देय राहील.
- तात्पुरत्या स्वरुपाच्या छावणीत दाखल होणाऱ्या जनावरांची पाऊसापासून संरक्षण होण्याकरिता शेड ची सोय करणे आवश्यक राहील तसेच रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था करणेत यावी.
- निवारा शेड उभारणे, प्रकाश योजना, पाणी, वाळलेला किंवा ओला चारा व पशुखाद्य या बाबींसाठी येणारा खर्च वर नमूद केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

Scanned with CamScanner

➢ जनावरांच्या छावण्यात दाखल झालेल्या जनावरांपासून उत्पन्न होणारे मलमूत्र याची विल्हेवाट संबंधित संस्थेने करावी.

➢ वाळलेल्या चाऱ्याचा साठा तसेच निवारा याचे आगीपासून संरक्षण करण्यासाठी आग प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी. तसेच पोलीस अधिनियम कलम, ११६/११७ नुसार छावणी परिसरात धुम्रपान करणेस प्रतिबंध करण्यात यावा.

➢ जनावरांच्या छावण्यात दाखल झालेल्या जनावरांना सर्व प्रकारच्या पशुवैद्यकीय सेवा कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत निःशुल्क पुरविण्यात येतील.

➢ छावणीत दाखल होणाऱ्या मोठ्या व लहान जनावरांना पिण्यासाठी पुरेशा प्रमाणात स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्यात यावे.

➢ शासन निकषाप्रमाणे छावणीत दाखल झालेल्या प्रति मोठ्या व लहान जनावरास प्रतिदिन वाळलेला किंवा हिरवा चारा व पशुखाद्य खालीलप्रमाणे देण्यात यावे.

| अ.क्र. | चाऱ्याचा प्रकार | मोठी जनावरे | लहान जनावरे |
|---|---|---|---|
| १) | हिरवा चारा | १५ किलोग्रॅम | ७.५ किलोग्रॅम |
| २) | पशुखाद्य (आठवड्यातून ३ दिवस १ दिवसाआड) | १ किलोग्रॅम | ०.५ किलोग्रॅम |
| किंवा | | | |
| १) | वाळलेला चारा | ६ किलोग्रॅम | ३ किलोग्रॅम |
| २) | पशुखाद्य (आठवड्यातून ३ दिवस १ दिवसाआड) | १ किलोग्रॅम | ०.५ किलोग्रॅम |

तरी सेवाभावी/गोरक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थेनी दिनांक २७/०७/२०२१ पर्यंत शासकीय वेळेत बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रके या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी. अधिकच्या माहितीसाठी मा. तहसीलदार, शिरोळ यांचे कार्यालयातील पुरवठा शाखेशी संपर्क साधावा.

R.K. Ranbhare
**(डॉ. रोहित रानभरे)**
**पशुधन विकास अधिकारी (विस्तार)**
**पंचायत समिती, शिरोळ**

**(डॉ. अपर्णा मोरे-धुमाळ)**
**तहसिलदार**
**तथा अध्यक्ष तालुकाआपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, शिरोळ**

प्रत माहितीसाठी:

१) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन समिती, कोल्हापूर यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा. उपविभागीय अधिकारीसो, इचलकरंजी यांना माहितीसाठी सविनय सादर

३) जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर- सदर माहिती जिल्ह्यातील सर्व प्रमुख वर्तमान पत्रांमधून प्रसिद्धी देणेबाबत कार्यवाही करावी.

४) एन.आय.सी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर- सदर माहिती एन.आय.सी पोर्टलवर प्रसिद्धी करण्यात यावी ही विनंती.

Scanned with CamScanner